सं. फौ. खटला क्र. २३०९/२०२५

निशाणी १ खाली

**<u>व्हेरिफिकेशन</u>**

**नाव : सई अविनाश निळकंठ**

वय : ३२ वर्षे, व्यवसायः खानावळ,

रा. राव कॉलनी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे.

शपथेवर कथन करते की, मी माझे दोन मुलांसह राहणेस आहे. माझे पतींचे ६ वर्षा पुर्वी निधन झालेले आहे. दि. ०९/०३/२०२५ रोजी माझे नंदेच्या पतींनी मला लाकडी दांडक्याने मारहाण केली. तसेच माझी ननंद मंगल लाखे यांनी देखील माझ्या पाठीत ठोसे मारले. तसेच घाणेरडी शिवीगाळ केली. माझ्या लग्नाच्या वेळी माझे पतींनी मला स्त्रीधन म्हणून १७ तोळे सोने घेतले होते. लग्न झाल्यावर ते मी सासू बाईंकडे ठेवायला दिले होते व त्या मला म्हणाल्या की, सदरचे सोने त्या लॉकर मध्ये ठेवतील. त्यानंतर सदरचे सोने मला माझे नंदेच्या अंगावर दिसले. त्यावर मी सासूबाईंना विचारले तेव्हा त्यांनी मला त्यांच्या घरी बोलविले. त्याप्रमाणे मी दि. ०९/०३/२०२५ रोजी त्यांच्याकडे गेले. तेथे माझी ननंद नॉनव्हेज बनवत होती व तिचे पती दारु पिउन तेथे बसलेले होते. त्यावेळी त्यांना राग आला व माझ्या ननंद मला म्हणाल्या की, तु माझ्या आईला का विचारते. त्यानंतर त्यांनी शिवीगाळ करुन मारहाण करण्यास सुरु केले. तेव्हा सासूबाई आडवायचा प्रयत्न करत होत्या. त्यावेळी मी जोरात ओरडल्यामुळे आमचे तेथील आजूबाजूचे नातेवाईक विनायक ज्ञानेश्वर कुदाळकर, भारती मल्हारी निळकंठ व लक्ष्मी राजु जावळेकर हे मला वाचविण्यासाठी आले. तसेच नंदेच्या पतीने मला तुझे हात पाय तोडतो तु त्या घरात कशी राहते तेच पाहतो तुला खल्लास करुन टाकतो अशी धमकी दिली. त्यानंतर मी तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे मी प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे.

**व्हेरिफिकेशन पूर्ण.**

समक्ष

सई. अ. निळकंठ

(साक्षीदार)

Mali 4.10.25

**(श्रीमती एस.ए.माळी)**

**५वे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,**

**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

**दि. ०४/१०/२०२५**